महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्र.- ४५ दिनांक ०३/०३/२०२१

## मिरारोड येथे खाजगी घरात चालना-या वेश्या व्यवसायावर अ.मा.वा. शाखा, भाईंदर पथकाने कारवाई करुन १६ वर्षीय पिडीत अल्पवयीन मुलीची केली सुटका

दिनांक ०१/०३/२०२१ रोजी मिरारोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील म्हाडा बिल्डींग, मिरारोड पुर्व या ठिकाणी अल्पवयीन मुलीकडुन जबरदस्तीने कौमार्यभंग करण्याकरीता जास्त रक्कम घेवुन वेश्या व्यवसाय चालवीला जात आहे. अशी बातमी मिळाली वरुन अमावाशा, भाईंदरचे वपोनि/श्री. संपतराव पाटील यांनी पथकासह नमुद पत्त्यावर बोगस गिऱ्हाईक पाठवुन छापा टाकला असता वेश्या दलाल महिला वय-२७ वर्षे, रा. म्हाडा बिल्डींग, मिरारोड पुर्व, मुळ रा. राज्य मध्यप्रदेश हिस ताब्यात घेवुन, १६ वर्षीय अल्पवयीन पिडीत मुलीची सुटका केली. नमुद महिला आरोपीने आल्पवयीन मुलीचे कौमार्यभंग करण्याकरीता १,००,०००/- रुपये ठरवुन ते स्वीकारल्याने आरोपी विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७९/२०२१ भादविसं कलम ३६६ (अ), ३७० सह अनै. प्रतिबंध कायदा १९५६ कलम ४,५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई डॉ. महेश पाटील, पोलीस उपायुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदरचे वपानि/ श्री. संपतराव पाटील, सपोनि/श्री. देविदास हंडोर, पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पो.हवा.१६३ रामा पाटील, पो.हवा./२२९८ निलंगे, म.पो.ना./१७८९ यंबर, पो.शि./३६६० शिंदे यांनी केली आहे.

------- ०००० ------